किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १/२०१८ मधील निशाणी १ खालील आदेश

CNR : MHND13-000007-2018

१— प्रस्तुतचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन १८२७ चे कलम ३ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर केला आहे.

२— अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार सा.क्र.१ महम्मद नासेरोददीन पि.नसिरोददीन याने शपथपत्र निशाणी—९ वर स्वत:स तपासले आहे. तो असे सांगतो की, मयत नसिरोददीन पि.रहिमोददीन शेख हे अर्जदार क्र.१ यांचे पती व त्याचे व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल होते व ते दिनांक २८/१२/२०१७ रोजी गोकुंदा, ता.किनवट, जिल्हा नांदेड येथे मरण पावले. अर्जदार क्र.१ ते ४ हेच मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. मयत नसिरोददीन हे किनवट येथील पाटबंधारे विभागात सफाईगार म्हणुन कार्यरत होते व त्यांचे दिनांक २८/१२/२०१७ रोजी हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर अर्जदार क्र.४ यास अनुकंपा तत्वावर नौकरी मिळणेसाठी तसेच इतर शासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची गरज आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांच्याशिवाय मयतास इतर कुणीही वारस नाही. करीता, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

३— अर्जदारांनी ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, ता.किनवट, जिल्हा नांदेड यांनी दिलेल्या मयत नसीरोददीन यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र अभिलेखावर निशाणी १० वर दाखल केले आहे. तसेच, मयत नसीरोददीन व अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधार ओळखपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे निशाणी ११ ते १५ वर सादर केल्या आहेत.

४— अर्जदारांनी दिनांक १३.०१.२०१८ रोजी दैनिक गोदातीर समाचार मध्ये जाहिर प्रगटन देउन मयत नसीरोददीन यांना अर्जदारांशिवाय इतर कुणी वारस आहेत काय किंवा अर्जदारांच्या सदर वारस प्रमाणपत्राच्या मागणीस कुंणाचा आक्षेप आहे काय याबाबत विचारणा करण्यात आली होती, परंतु, अर्जदाराशिवाय कुणीही मयतांचे वारस असल्याबाबत पुढे आलेले नाहीत किंवा सदर अर्जास कुणीही आक्षेप घेतला नाही. सदर जाहिर प्रगटण ज्या दैनिकात प्रसिध्द झाले त्यातील जाहिर प्रगटण निशाणी—१६ वर आहे. अर्जदारांनी सदरचे जाहिर प्रगटण दिल्यानंतरही कुणीही आक्षेप घेतला नसल्यामुळे तसेच सादर केलेल्या पुराव्यावरून असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ ते ४ हेच मयत नसीरोददीन यांचे कायदेशीर वारस आहेत. म्हणुन, अर्जदारांनी विनंती केल्यानुसार वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात प्रदान करणे न्यायोचीत आहे असे माझे मत झाले आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :—

## आ दे श

अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत महंमद नसीरोददीन पि.रहिमोददीन शेख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात, आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर, प्रदान करण्यात यावे.

अर्जदारांनी क्षतीपुर्ती बंधपत्र (Indemnity Bond) दयावे.

दिनांक :— १६/०३/२०१७

( प्र.ग.महाळंकर ),
सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर,
भोकर.

CERTIFICATE

( As per District Court, Nanded, Circular No.Computer/3257/2014, dated 15/05/2014 )

I affirm that the contents of this P.D.F.file Judgment are same word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer :- U.L.Sadhu
Court name : Court of the Joint C.J.J.D.& J.M.F.C.Bhokar.
Date : -16-03-2018
Judgment signed by the Presiding Officer on :-16/03/2018
Judgment uploaded on :- 29/03/2018